**रे.दि.मु. नं. १४/२०१९**
**नि. क्र. ८७**

**नाव - अशोक शिवराम सुर्वे,**
**व्यवसाय - शेती, वय -७० वर्ष,**
**रा. सुर्वेवाडी, मु. पो. ताम्हाणे**
**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**वादीतर्फे साक्षीदार अशोक सुर्वे यांचा सरतपास वादीतर्फे वकील श्री. ए. सी. आठल्ये यांचेकडुन शपथेवर -**

१. वादी मंदाकिनी गजानन शिंदे या माझ्या मावस बहिणीचा मुलगा आहे. माझ्या मावस बहिणीचे माहेरचे नाव मंदाकिनी सदाशिव लाड असे होते. मला त्यांच्या माहेरचे नातेवाईक सांगता येणार नाहीत. सदाशिव लाड यांना दत्ताराम आणि मंदाकिनी अशी दोन मुले होती. दत्ताराम यांना रविभूषण आणि स्वाती अशी दोन मुले होती. मंदाकिनी हिला निलेश आणि चंद्रशेखर अशी दोन मुले होती.

**सरतपास पूर्ण**

**वादीतर्फे साक्षीदार अशोक सुर्वे यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री. सी. एम. मांगले यांच्याकडून शपथेवर सुरु -**

१. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ च्या बाजुने प्रतिज्ञापत्र दिले होते. मी यापूर्वी वादीच्या वतीने दाव्यामध्ये कोणतेही प्रतिज्ञापत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की मला हे सांगता येणार नाही दाव्यामध्ये चंद्रशेखर शिंदे यांच्याबाजुने मी यापूर्वी प्रतिज्ञापत्र दाखल केले असल्यास ते कसे आले. मी अॅड गिडये नोटरी यांना ओळखतो. मी या प्रकरणामध्ये नोटरी वकील अॅड गिडये यांच्याकडे प्रतिज्ञापत्र करण्यास गेलो नव्हतो.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.28 17:52:27 +0530

२. हे म्हणणे खरे आहे की मी मंदाकिनी लाड यांच्याशी माझे नाते शाबीत करणारा कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की

निलेश प्रतिवादी क्र. ३ यांना एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की वादीला एक मुलगा आहे. मला हे माहिती नाही की प्रतिवादी क्र. १ ला मुलगा व मुलगी आहे. मला माहिती नाही की प्रतिवादी क्र. २ हिला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. हे मला माहिती नाही की प्रतिवादी क्र. १ ला  पूर्वा आणि कल्पेश अशी दोन मुले आहेत व प्रतिवादी क्र. २ ला चिरांग असा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या म्हणण्यानुसार माझे वादीशी जितके जवळचे नाते आहे तितकेच प्रतिवादी क्र. १ शी देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे वादीशी नातेच नसल्याने प्रतिवादी क्र. १ व २ च्या मुलांविषयी मला माहिती नाही.हे म्हणणे खरे आहे की वाटपाचा दावा केल्याबाबत मला वादीने माहिती दिली. हे म्हणणे खरे आहे की वादमिळकतीमध्ये वादीला हिस्सा मिळावा अशी माझी इच्छा आहे.  हे म्हणणे खरे आहे की वादीला हिस्सा मिळावा या हेतुने मी आज रोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीचे असलेले नाते मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे  नाही की सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ अशोक सुर्वे यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे वकील कु. अंकिता पवार यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.28 17:52:38 +0530

(श्रुती ह. पाटील )

दि. २८/०७/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख